


**About Us:** http://www.galaxyimrj.com/about-us/
**Archive:** http://www.galaxyimrj.com/archive/
**Contact Us:** http://www.galaxyimrj.com/contact-us/
**Editorial Board:** http://www.galaxyimrj.com/editorial-board/
**Submission:** http://www.galaxyimrj.com/submission/
**FAQ:** http://www.galaxyimrj.com/faq/

# “मराठी आदिवासी कथा लेखनाचा ऐतिहासिक परामर्श”

रमेश नुरजी वळवी
संशोधक विद्यार्थी,
मराठी विभाग, भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्र,
क.ब.चौ.उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव.
प्रा. डॉ. रवींद्र डोंगर पाटील
संशोधन मार्गदर्शक,
वसंतराव नाईक कला, विज्ञान, वाणिज्य महाविद्यालय शहादा,
जि. नंदुरबार.

प्रस्तावना :-

आदिवासी कथा साहित्य प्रकाराचे लेखन म्हणावे तसे झाले नसले, तरी जागतिकीकरणाच्या काळात विविध बाजूंनी मांडणी करत आदिवासी कथाकारांनी उल्लेखनीय अश्या कथा वेगवेगळ्या माध्यमातून प्रकाशित करून आपला ठसा उमटविलेला दिसतो. स्वातंत्र्योत्तर काळात मराठीतील वेगवेगळ्या साहित्यप्रवाहांनी कथा वाङ्‌मय प्रकाराचे विपूल असे लेखन केले आहे. त्याचप्रमाणे आदिवासी साहित्याने देखील आपल्या जीवनानुभूतीचा संघर्ष मांडण्यासाठी कथा साहित्य प्रकार हाताळलेला आहे. त्यात बिगर आदिवासी व आदिवासी कथाकारांनी कथा लेखन केलेले आढळते.

‘कथा’ हा शब्द ‘कथ्’ हया धातूपासून उत्पन्न झालेला आहे. त्याचा अर्थ सांगणे अथवा वर्णन करणे असा आहे. ‘कथानक’ हाच कथेचा ‘कणा’ असतो. मानवी जीवन आणि जीवनाशी निगडीत झालेल्या सर्व घटकांचा त्यात समावेश असतो. निसर्ग आणि मानवी जीवन यांच्यातील संघर्ष, समन्वयातून कथाविश्व साकार होत गेलेले असते. मानवी श्रद्धा, परंपरा, धार्मिकता, सामाजिक रूढी, चालीरीती, राजकीय व्यवस्था, मानवी सनातन भाववृत्ती इ. मानवी जीवनातील अनुभवांच्या, कल्पनांच्या विश्वातून कथेचा प्रवास मौखिक वा लिखित स्वरुपात अव्याहतपणे चालत असलेला असतो. म्हणूनच मानवी जीवनाला असंख्य कथांची एक दीर्घ मालिका संबोधण्यात येते.

मराठी साहित्यात कथा हा समृद्ध असा वाङ्:मय प्रकार आहे. मराठी कथेची सुरुवात हरिभाऊ आपटेंच्या स्फुट गोष्टींपासून करावी लागते. हरिभाऊ आपटेंच्या स्फुट गोष्टींपासून कथेची सुरुवात झाली असली तरी, त्यांच्या काळातल्या कथेचा अस्ताव्यस्त आणि विस्कळीत असा रूपबंध लोप पावून वि. सी. गुर्जरांच्या काळात ती चटकदार व आटोपशीर झाली. गो.गं. लिमये यांनी योजनाबद्ध रेखीवपणा आणला, दिवाकर कृष्णांनी काव्यात्मतेची, तर दिवाकरांनी नाट्यात्मतेची जोड दिली. फडके – खांडेकरांच्या काळात कथेला तंत्रकुशल रूपबंध मिळाला. या तंत्रकुशलतेच्या प्रत्यक्ष विरोधातून य. गो. जोशी, श्री. म. माटे, विभावरी शिरुरकर, वामन चोरघडे, कुसुमावती देशपांडे इत्यादींची कथा मराठी कथेला समृद्ध करीत राहिली. या सर्वांच्या कथा मनोरंजन – प्रेम प्रधान- सामाजिक आशय- रहस्य – प्रणयकथा – अतिरिक्त कल्पना विलास या आशय सूत्रांना कवटाळून पुढे-पुढे सरकत होते. त्यातून शहरी, पांढरपेशी, स्री-विषयक, ग्रामीण समाजवास्तव सांस्कृतिक इतिहास अधोरेखित होत असला तरी, आदिवासी जीवनाला, त्यांच्या सांस्कृतिक, भाषिक वैशिष्ट्यांना स्पर्श करणारी कथा मात्र मराठी साहित्यात येत नव्हती.

पहिल्या आदिवासी लेखन करणाऱ्या कथाकारांमध्ये श्री नारायण यांचे 'तंट्या मामा' ही कथा 'मनोरंजन' या मासिकात १९०५ साली प्रसिध्द झाली. तंट्या भिल्लाला तंट्या मामा म्हणूनही ओळखले जाते. यांच्या जीवन कर्तृत्वाचा आलेख म्हणजे ही कथा होय. भिल्ल जीवनातील बारकावेही त्या निमित्ताने कथेत आढळतात. १९३१ मध्ये दिवाकर कृष्ण यांच्या 'दंडकारण्यातील प्रणयिनी' या कथेच्या रूपाने मराठी कथेत पहिल्यांदा आदिवासींच्या सांस्कृतिक सामाजिक जीवनाला स्पर्श झाला.

शांताराम उर्फ के.जे. पुरोहित यांचा 'लाटा' हा कथासंग्रह सन १९३२ साली आला. त्यातील 'बळी' या कथेत 'नागोगोंड' आणि 'झिमा' ही दोन पात्र उभी करून गावातील धनाढ्य 'धनीराम शेठ' हा झिमाशी बळजबरीने अनैतिक संबंध ठेवण्याचे कपट शिजवतो व शेवटी अन्यायाची परिसीमा पार केलेल्या धनीरामचा मुडदा नागुगोंड्याचा

हातून पाडला जातो, याचे चित्रण या कथेतून उभे केले आहे. आपल्या कुटुंबावरील अन्यायाविरुद्ध सूड उगवणारी नागोगोंडच्या रूपाने मराठीमध्ये कथा अवतरते.

१९४५ ते ६० या काळात ‘नवकथा’ रुजली व विकसित झाली. गंगाधर गाडगीळ, पु.भा. भावे, अरविंद गोखले व व्यंकटेश माडगूळकर यांना नवकथेचे शिल्पकार म्हटले जाते. कथेची कथानक प्रधानता, घटना प्रधानता तिने बाजूला ठेवली. निवेदनाचे अनेक प्रयोग नवकथेने केले. विषयाची बंधने नाकारली. विशिष्ट भावाशय निर्माण करणाऱ्या अनुभवांच्या प्रवाहातून आकार घेणारी, गंभीर, प्रगल्भ आणि जीवनाचे वास्तव दर्शन घडवणारी, मानवी मनाच्या असंज्ञ पातळीवरील गूढ व्यापारांकडे लक्ष वेधणारी कथा नवकथाकारांनी लिहिली. १९६० नंतरच्या काळात ‘कथा’ या साहित्यप्रकाराचे महत्व कमी झाले. तथापि कमाल देसाई, सानिया, गौरी देशपांडे, विलास सारंग, श्याम मनोहर, भाऊ पाध्ये, दिलीप चित्रे अशा अनेक कथाकारांनी कथेच्या क्षेत्रात लक्षणीय कामगिरी नोंदविली.

वामन चोरघडे यांच्या ‘मातीची भांडी’ हा कथासंग्रह १९६० मध्ये प्रकाशित झाला. ‘मातीची भांडी’ ही कथा आदिवासींच्या गोंड जमातीतील काशीच्या जगण्याच्या प्रश्नावर भाष्य करते. १९६६ मध्ये किशोर घोरपडे यांची ‘लिलाव’, दयानंद मुकडे यांची ‘बायजा’, सुनंदा ठाकूर यांची ‘झलकारी’ या कथा आदिवासी जीवनावर प्रकाश टाकणाऱ्या आहे. आदिवासींच्या जीवनात समरस झालेले व अनुभवातून आपले कथाविश्व उभे करणारे सलीम अहमद शेख यांचा ‘रानातील मानसं’ हा कथासंग्रह १९८३ साली प्रकाशित झाला. या संग्रहात एकूण दहा कथा असून या कथेमध्ये ठाणे जिल्हयातील डहाणू, तलासरी, पालघर, मोखाडा आदी भागातील आदिवासी जीवनाला शब्दबद्ध केले आहे.

दिवाकर कृष्णांपासून सलीम शेखपर्यंतच्या आदिवासी जीवनावरील कथांविषयी डॉ. संजय लोहकरे म्हणतात, “दिवाकर कृष्णांपासून सलीम शेखपर्यंतचे सर्वच कथालेखक हे बिगर आदिवासी आहेत. आदिवासींकडे बघण्याची दृष्टी वरवरची, प्रयोगशील, धर्मप्रसारक किंवा आदिवासी बिचारे! म्हणणारी आहे. आदिवासी जीवन, कला, संस्कृती, सद्य:स्थिती

केवळ काल्पनिक आहे. आदिवासींच्या समग्र जीवनाचा शोध घेणारी, आदिवासींच्या बोलीत अभिव्यक्त होणारी आणि आदिम मानवतावादी, निसर्गवादी जीवनपद्धती कवेत घाणारी आदिवासी कथा १९९०पर्यंत लिहिली गेली नाही"

१९६० नंतर शंकरराव खरात, अण्णाभाऊ साठे, बाबुराव बागुल, शंकर पाटील, द.मा. मिरासदार या कथालेखकांनी ग्रामीण, भटके, दलितांच्या जीवन वास्तवाचे भान प्रस्थापित व्यवस्थेला निर्माण करून दिले. या विविध मानवसमूहांचा सांस्कृतिक इतिहास कथेच्या रूपाने पडद्यावर येऊ लागला. आशय, अभिव्यक्ती आणि भाषेत झालेला बदल अनेक कथालेखकांना प्रेरणादायी ठरला. यांच्या कथा पूर्णतः आदिवासी जाणीवेच्या नसल्या तरी आदिवासी जीवनाच्या समरस जाणाऱ्या आहेत. उपेक्षित दलित, ग्रामीण समाजाच्या जीवन जगण्याच्या तऱ्हा, वेदना, दु:खाचे चित्रण करणाऱ्या त्यांच्या कथा असल्या तरी व्यथा मात्र आदिवासी जीवनानुभूतीशी जुळणारी आहेत. मराठी कथा वाङ:मय हे सागरासारखे अफाट आहे. मराठी कथाकारांची संख्याही तशी मोठीच आहे. मराठी वाङ:मयाचा विकास कसा होत गेला या मराठी कथासागराचा तळ शोधला असता क्वचित एखाद्या शिंपल्यात मोती सापडावा तसे आदिवासी कथेचे मोती धारण करणारे मराठी कथाशिंपले संख्येने फार विरळ आहेत.

१९९० च्या अगोदर अदिवास कथाशिंपले फार विरळ आहेत. कोसोदूर शहरापासून दऱ्याखोऱ्यात, जंगलाच्या सानिध्यात राहणाऱ्या आदिवासींच्या निराळ्या जीवन जाणिवांसह हळूहळू एक-एक विषय त्यांच्या कथेचे विषय बनले. आदिवासी साहित्यिकांनी कथेच्या रूपाने आपल्या जगण्याच्या तऱ्हा व जीवन राहटीसह अभिव्यक्ती व्हायला सुरुवात केली. खरे तर, १९९० नंतर या देशात जागतिकीकरणाचे वारे वाहू लागले होते. जीवनमूल्यांपेक्षा, मानवी मूल्यांपेक्षा, अर्थ व्यवस्थेला केंद्रस्थानी ठेवले जाऊ लागले होते. शहरीकरणाने हळूहळू खेडी, तिथली जमीन, संस्कृती, भाषा गिळंकृत करण्यासाठी जबडा वासला होता. अशा वेळी आदिवासी शिक्षण, आरोग्य, कुपोषण, नक्षलवाद, सावकारशाही,

धर्मांतर सारख्या प्रश्नांच्या विळख्यात अडकला होता. आदिवासींच्या जंगल संपत्तीवर सरकारी व खाजगी ठेकेदार टपून बसले होते. या सगळ्या प्रश्नांना घेऊन आदिवासी लिहू-बोलू लागला होता. साहित्याच्या शस्त्राने व्यवस्थेच्या विरुद्ध जमवाजमव करू लागला होता. पण तो प्रश्नांच्या खोल गर्तेत अडकल्याने लढण्याची हिम्मत दाखवत नव्हता. दुसऱ्या बाजूला जागतिकीकरणाने पेटलेला देश आणि त्यातून निर्माण झालेली अर्थव्यवस्थेची आग, तिचा धूर आदिवासी पाड्यांपर्यंत येऊ लागला होता. त्याचे परिणाम आदिवासी कथेवर जाणवू लागले होते.

आदिवासी लेखकांचे कथालेखन साधारणतः खऱ्या अर्थाने १९९० नंतरचा दिसतो. आदिवासींचे जीवन चित्रित करणाऱ्या अनेक कथा आदिवासीएतर लेखकांनी समृध्द केल्या आहेत. त्या तुलनेत आदिवासी लेखकांनी लिहिलेल्या कथा फार दुर्मिळ आहेत. कथांमधून आदिवासी जीवन जाणिवांची ओळख आदिवासीएतर लेखकांनी करून दिली, हे वास्तव देखील आपणास नाकारता येणार नाही. मात्र आदिवासी कथा लेखक हि मागे राहिले नाही, त्यांचे जीवनानुभूतीचे वास्तव चित्रण कथेतून आता रेखाटन करताना दिसतात. उषाकिरण आत्राम, माधव सरकुंडे, कुंडलिक केदारी, रामराजे आत्राम, संजय दोबाडे, नजूबाई गावित, संजय लोहकरे, सुनील गायकवाड, विश्राम वळवी, रमजान तडवी आदि कथाकारांनी आदिवासी कथांना सकस व समृध्द बनविण्याचे काम केले. आदिवासी समाजातील ज्या पहिल्या पिढीने शिक्षण घेऊन साहित्याची लेखणी हातात घेतली आणि साहित्यात आजूबाजूला वावरत असलेले राजकारण, बेगडीपणा, उसनवारीपणा त्यांच्या लक्षात आल्यावर आपल्या अंत:करणात दाबून ठेवलेला हुंकार लेखणीच्या माध्यमातून व्यक्त केला. आदिवासी कथेच्या बाबतीत नेमके तसेच काहीसे झाले. सुरुवातीच्या काळातील ज्या आदिवासी कथा प्रकाशित झाल्या त्या बहुतेक करून कुठेतरी नियतकालिकांमधून, दिवाळी अंकामधून प्रकाशित झाल्या, मात्र कथासंग्रहाच्या रूपाने प्रकाशित झालेल्या कथा मोजक्याच दाखवता येतात. आज आदिवासी कथेला चांगले दिवस आले आहेत.

स्वतंत्र मराठी आदिवासी कथेचा वाङ्:मयीन अविष्कार आदिवासी साहित्यामध्ये पहिल्यांदा कथासंग्रहाच्या रूपने प्रकाशित झालेला उषा किरण आत्राम यांचा 'अहेर' (१९९६) या कथासंग्रहाची नोंद घेता येते. त्यांच्या 'अहेर' या कथासंग्रहात अहेर, बाजा, जनी, संघर्ष, परिवर्तन अशा सहा कथा आहेत. विवाहाच्या पहिल्या रात्री जमीनदारांकडून लुटल्या जाणाऱ्या रमीची व्यथा 'अहेर' या कथेत येते. आपल्यावर होणाऱ्या अन्यायाचा व आदिमांच्या ह्या पिढ्यांपिढ्या होणाऱ्या शोषणाला उधळून टाकण्याचे जे साहस केले आहे, त्याचे अत्यंत बेभानपणे चित्रण या कथेत आले आहे. तसेच माधव सरकुंडे यांचा 'सर्वा' (२०००), ताडमं (२००१), कुंडलिक केदारी यांचा 'अस्वस्थ मी' (२००७), रामराजे आत्राम 'नवं लुगडं' व 'मसनवटा' (२०११), संजय दोबाडे 'पितळ' (२०११), नजूबाई गावित 'नवसा भिलणीचा एल्गार' (२०१२), बाबाराव मडावी 'भाकर' (२०१३), सुनील गायकवाड 'भोंगऱ्या' (१९९५), संजय लोहकरे 'डांगाणी माणसं' (२०१५), संपा. संजय लोहकरे 'कथाबोली' (१९१६), सुनील गायकवाड 'गल्लूर' (२०१७), संजय लोहकरे 'राब' (२०१८), उषाकिरण आत्राम 'शिकार फत्ते झाली' (२०१८) विश्राम वळवी 'आदिरंग' (२०१८), रमजान गुलाब तडवी 'रानमेवा' (२०२१) संजय दोबाडे 'डाऊन सिंड्रोम' (२०२१), सुनील गायकवाड 'भिलाटी' (२०२३) अशा सर्वच कथाकारांच्या कथेने मराठी आदिवासी कथेला सकस व समृध्द केले आहे.

- समारोप :-

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर सुशिक्षित झालेले संवेदनशील तरुण पिढी लिहू लागली. त्यांच्या लेखनातून व्यक्त होणाऱ्या जाणिवा नव्या होत्या. साहित्याची निर्मिती करणारी हि तरुण पिढी नुसतीच सुशिक्षित नव्हती तर विशिष्ट अशा वैचारिक संस्काराने संस्कारित झालेली पहिली पिढी होती. हयातून मराठी कथा विकसित झालेली दिसून येते. इतर साहित्य प्रवाहांपाठोपाठ आदिवासी कथेचे दालन ही समृध्द झाल्याचे पाहायला मिळते. आदिवासी समाज आणि

समाजाच्या दऱ्याखोऱ्यातून आलेली पहिली पिढी होती. शिक्षण घेण्याच्या निमित्ताने त्यांच्या जाणिवा विस्तारत गेल्या. आदिवासी साहित्य लेखनाला खऱ्या अर्थाने १९७५ नंतर सुरुवात झाली. त्यात बिगर आदिवासींचे आदिवासी जीवनावरील कथालेखन हयात आदिवासी जीवन जाणिवांचा ऊहापोह करून आपल्या कथेतून आदिवासी जीवन उभे केले आहे. मात्र त्या काळात आदिवासी कथाकारांच्या कथा अल्प होत्या. परंतु ही कोंडी सोडविण्याचे काम नवशिक्षित आदिवासी पिढीने केले आहे. उषाकिरण आत्राम, माधव सरकुंडे, कुंडलिक केदारी, रामराजे आत्राम, संजय दोबाडे, नजूबाई गावित, बाबाराव मडावी, सुनील गायकवाड, संजय लोहकरे, रमजान तडवी, विश्राम वळवी आदि सर्वच कथाकारांच्या कथेने मराठी आदिवासी कथेला पोषक व समृध्द केले आहे. अलीकडे मात्र आदिवासी कथेने भरभराट अशी वाटचाल केलेली दिसून येते.

- संदर्भ :-


१. डॉ. बी. एन. पाटील, खानदेशी अहिराणी लोककथा : सामाजिक, सांकृतिक विचार, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगांव, प्रथमावृत्ती : जाने. २००३.

२. संपा. डॉ. गजानन बनसोड, कथाप्रवाह : मूल्य आणि स्वरूप, पायगुण प्रकाशन अमरावती, प्रथमावृत्ती : २६ नोव्हेंबर २०१७.

३. संपा. डॉ. शिवलिंग मेनकुदळे, आदिवासी साहित्य : संकल्पना, स्वरूप व वाटचाल, अविष्कार प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती : ५ सप्टेंबर २०२१.

४. संपा. डॉ. संजय लोहकरे, फडकी १५ फेब्रु ते जुलै २०२१, अंक ३ ते ८.

५. संपा. वसंत आबाजी डहाके, वाङ्‌मयीन संज्ञा-संकल्पना कोश, जी.आर. भटकळ फाउंडेशन, प्रथमावृत्ती : डिसें २००१

६. संपा. डॉ. तुकाराम रोंगटे, फडकी (मासिक), १५ मे २०१७ वर्ष १० वे, अंक ६-७.